# फळसेवाडी हितकारी संस्था
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : शनिवार ०३ फेब्रुवारी २०१८
**स्थळ** : १४ कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – ४०० ०५३.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 8. श्री गुरुनाथ गणपत राणे (आमंत्रित) |
| 2. श्री सुनिल सदानंद राणे | 9. श्री सुनिल विनायक राणे (आमंत्रित) |
| 3. श्री उदय भगवान राणे | 10. श्री संतोष मोहन राणे (आमंत्रित) |
| 4. श्री दशरथ दत्ताराम साटम | 11. श्री रमाकांत बालशिवाजी राणे (आमंत्रित) |
| 5. श्री रंजन रावजी म्हसकर | |
| 6. श्री अशोक दत्ताराम राणे | |
| 7. श्री भरत गणपत राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारिणीची सभा संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांचे निवासस्थानी (शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल येथे) घेण्यात आली. सभेस कार्यकारीणीतील ७ सदस्य तसेच आमंत्रितांपैकी ४ आमंत्रित ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री सुनिल सदानंद राणे, सचिव यांनी प्रथम उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करताना सचिवांनी विषयपटलावरील विषय उपस्थितांस वाचून दाखविले.

**<u>विषय क्रमांक १ अंतर्गत</u>** सचिवांनी दिनांक ०४ नोव्हेंबर २०१७ रोजी घेण्यात आलेल्या कार्यकारीणी सभेचे इतिवृत्त उपस्थितांना वाचून दाखविले. उपस्थिताकडून इतिवृत्तामध्ये कोणत्याही सुचना / सुधारणा सुचविण्यात आल्या नसल्यामुळे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

**<u>विषय क्रमांक २ अंतर्गत</u>** सचिवांनी माहीती दिली कार्यकारीणीने यावर्षी (आर्थिक वर्ष २०१७ – १८) तीन महत्वाची कामे हाती घेतली होती त्यापैकी –

- आठ ठिकाणी पथदिवे लावले असले तरी चार पथदिव्यांसाठी विजपुरवठा ग्रामस्थांच्या घरातून घेतल्यामुळे ते पथदिवे बऱ्याच वेळा चालू केले जात नाहीत. याकारणांमुळे लवकरात लवकर आपणांस या पथदिव्यांची जोडणी सध्या उपलब्ध असलेल्या सार्वजनिक विद्युतव्यवस्थेवर करावयास हवी व त्यादृष्टीने वायरची व्यवस्था करावयास हवी. यासाठी लागणाऱ्या वायरची मोजणी करण्यात आलेली असून लवकरात लवकर हे पथदिवे सार्वजनिक विजपुरवठ्यावर चालू करण्याचा प्रयत्न केला जाईल.

- पाणीपुरवठा योजनेअंर्तगत बांधावयाच्या पाण्याच्या टाकीच्या बांधकामासंर्दभात मागील सभेत श्री प्रविण मधुकर राणे यांनी त्यांच्या घराचे बांधकाम करणारे कंत्राटदार श्री अवधूत हळदणकर यांस हे काम

करावयास सांगू असे सांगितले होते. श्री मंगेश मनोहर राणे, श्री सुनिल सदानंद राणे व श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी श्री संकेत रत्नाकर राणे यांच्या विवाहानिमित्ताने गावी जाणे झाले असता श्री हळदणकर यांची भेट घेऊन त्यांस प्रत्यक्ष बांधकाम करावयाच्या जागेची माहीती आणि बांधकामाचा आराखडा दिला होता. परंतू याकामाबाबत कंत्राटदाराकडून काहीच हालचाल झालेली नाही.

- फळसेवाडीवर येणारा मुख्य रस्त्याची दुरुस्ती तसेच गाडीतळ ते टेंबावरती जाण्यासाठी तयार केलेल्या आणि गेल्यावर्षी मे २०१७ मध्ये ग्रामपंचायतीच्या दप्तरी नोंद करण्यात आलेल्या नवीन वाहनरस्त्याचे खडीकरण / डांबरीकरणाच्या संर्दभात श्री संकेत रत्नाकर राणे यांच्या विवाहप्रसंगी श्री सुहास राणे नवनिर्वाचित सरपंच, पिसेकामते ग्रामपंचायत यांची श्री दशरथ साटम यांनी भेट घेऊन या कामांबद्दल विचारणा केली असता त्यांनी ही कामे मार्च २०१८ पूर्वी मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे.

आपण श्री लिंगेश्वर देवालयाच्या जिर्णोध्दार कामाच्या निमित्ताने पिसेकामते विकास मंडळ तसेच पिसेकामते ग्रामपंचायत सदस्य यांच्या संर्पकात असल्यामुळे संस्था याकामांबाबत सतत पाठपुरावा करत राहू शकेल व त्यामुळे हे काम लवकरच मार्गी लागेल ही अपेक्षा आहे.

तसेच रस्त्याच्या बांधकामासाठी पेव्हर ब्लॉक वापरण्यासंबधी श्री प्रविण मनोहर राणे यांनी मागिल सभेत केलेल्या सूचनेनंतर त्यांचेकडून पुढे काही माहिती मिळू शकली नाही. श्री प्रविण मधुकर राणे आजच्या सभेस उपस्थित नसल्यामुळे हा विषय पुढील सभेत त्यांच्या उपस्थितीत चर्चेस घेण्यात येईल.

**<u>विषय क्रमांक ३ अंर्तगत</u>** सभासद नोंदणी मोहिमेचा आढावा घेतांना सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की ३१ जानेवारी २०१८ पर्यंत –

- एकूण ६६ ग्रामस्थांशी संर्पक करण्यात आला असून त्यापैकी ६४ ग्रामस्थांनी सभासदत्वाचे फार्म भरून दिले आहेत.
- सभासद होऊ इच्छिनाऱ्या ग्रामस्थांपैकी ४० ग्रामस्थ वार्षिक वर्गणी भरू इच्छिनारे असून उर्वरीत २४ ग्रामस्थांनी वार्षिक वर्गणी भरण्याबाबत सवलत मागितली आहे.
- तसेच ३१ जानेवारी पर्यंत संस्थेकडे थकबाकीपैकी रु.१८,०२०/- इतकी रक्कम जमा झाली असून, नविन सभासदांची प्रवेश फी रु.४,३००/- तसेच वार्षिक साल २०१६-१७ साठीच्या वार्षिक वर्गणीपैकी रु.२४,०००/- रक्कम जमा झालेली आहे.

| | **पुरुष** | **स्त्री** | **मृत सभासदांचे कुटूंबिय** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| ग्रामस्थांशी संर्पक करण्यात आला | 39 | 27 | 4 | 70 |
| सभासदांकडून फार्म भरून मिळाले | 37 | 27 | - - | 64 |
| वार्षिक फी भरू  इच्छीणारे सभासद | 30 | 10 | - - | 40 |

| | सभासद संख्या | रक्कम जमा |
|---|---|---|
| सभासदांकडून थकबाकी जमा | 24 | 18,020 |
| नविन सभासदांकडून नोंदणी फी जमा | 43 | 4,300 |
| वार्षिक फी भरू इच्छीणाऱ्या सभासदांकडून २०१७ – १८ सालाची वार्षिक फी जमा | 40 | 24,000 |
| सभासदांकडून देणगी प्राप्त | 1 | 5,000 |
| **आर्थिक वर्ष २०१७ – १८ साली जमा** | | **51,320** |

सचिवांनी उपस्थितांस सांगितले की जमा झालेली रक्कम वेळोवेळी संस्थेच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे. सचिवांनी पुढे सांगितले की कार्यकारीणी सदस्य या कामाबद्दल उदासिन असल्यामुळे सभासद नोंदणीस मिळत असलेला प्रतिसाद उत्साहवर्धक नाही. आपण स्वबळावर प्रायोजित कामे पूर्ण करावयाचा प्रयत्न करत असल्यामुळे कार्यकारीणी सदस्यांनी लवकरात लवकर सभासद नोंदणी अभियान पूर्णत्वास नेण्यास सहाय्य करावे.

**विषय क्रमांक ४ अंर्तगत** सचिवांनी माहीती दिली मागील सभेनंतर कोणाही ग्रामस्थाकडून संस्थेची पत्रव्यवहार झालेला नाही.

**विषय क्रमांक ५ अंर्तगत** कोणत्याही नवीन योजना उपस्थितांकडून मांडण्यात आल्या नाहीत,

त्यानंतर सचिवांनी उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

---

श्री सुनिल सदानंद राणे
सचिव

श्री मंगेश मनोहर राणे
अध्यक्ष